# 2022-23

## ५५ वा वार्षिक कार्यवृत्तांत





सत्यं शिवं सुंदरम्

# नाना पालकर स्मृती समिती

रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा



Financial aid to under privileged/
poor patient is provided by

सत्यं शिवं सुंदरम्

**NANA PALKAR SMRUTI SAMITI**

रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा

with financial support of

**HDFC Securities**

## ''रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा''

नाना पालकर स्मृती समिती गंभीर आजाराने ग्रासलेल्या गरीब व गरजू रुग्णांना प्रामाणिकपणे व ध्येयासक्त वृत्तीने वैद्यकीय मदत देण्यास समर्पित आणि वचनबद्ध आहे. मानवतावादी दृष्टिकोन बाळगून, रुग्णांची आरोग्य चिकित्सा सुरू असताना रुग्ण व त्याचे कुटुंबीय यांना वैद्यकीय उपचारांमधील सर्व शक्य सहाय्य समितीमार्फत दिले जाते. समिती गेली ५५ वर्षापासून अविरतपणे रुग्णसेवेचे कार्य करीत आहे.

कै. श्री. नारायण हरी पालकर समाजात ''नाना पालकर'' म्हणून लोकप्रिय होते. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पूर्ण वेळ प्रचारक म्हणून नानांनी समाजात फार मोठे कार्य केले. जनतेची सेवा, गरीब व गरजू रुग्णांना आवश्यक ते सहाय्य व रुग्ण सेवा हेच त्यांनी त्यांच्या आयुष्याचे ध्येय मानले आणि शेवटपर्यंत ते या आदर्शासाठी कटिबद्ध होते. नाना हे एक उत्तम लेखक व कवी होते. आयुष्यभर त्यांनी रुग्णांच्या वेदना आणि दु:ख दूर करण्यासाठी अथक परिश्रम घेतले.

१ मार्च १९६७ रोजी नाना पालकरांच्या दु:खद निधनानंतर त्यांचे रुग्ण सेवेचे कार्य पूर्णत्वास नेण्यासाठी नानांचे अनुयायी, सुहृद व कार्यकर्ते एकत्र आले. त्यातून १ मार्च १९६८ रोजी नाना पालकर स्मृती समितीची स्थापना झाली.

### आमचे ध्येय :

विविध माध्यमातून गरीब रुग्ण व त्यांच्या कुटुंबियांना भावनिक, मानसिक व आर्थिक वैद्यकीय सहाय्य प्रदान करण्यात उच्चस्तरीय उत्कृष्टता प्राप्त करणे.

### आमचे उपक्रम :

- रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना मोफत राहण्याची व्यवस्था
- अन्नपूर्णा योजने अंतर्गत रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अन्न सुविधा
- डायलिसिस केंद्र ( परळ, सांताक्रुझ व बोरीवली)
- डे केअर केमोथेरपी केंद्र (बोरीवली)
- सर्व स्तरातील जनतेसाठी नाममात्र दरात आधुनिक व संगणकीकृत रक्त तपासणी केंद्र
- मोबाईल व्हॅनद्वारे स्तन कर्करोग तपासणी व जागरुकता.
- रुग्णवाहिका सेवा
- क्षयरोग रुग्णांसाठी मोफत तपासणी, औषधे व रक्त तपासणी.
- क्षयरोग रुग्णालय, शिवडी येथील रुग्णांना खजूर वाटप तसेच वाडिया बाल रुग्णालयातील मुलांना फळे वाटप
- गरीब व गरजू रुग्णांसाठी वैद्यकीय आर्थिक मदत
- सामान्य जनतेसाठी तज्ज्ञ व अनुभवी तज्ज्ञांमार्फत वैद्यकीय चिकित्सा
- रक्तदान शिबिरांचे आयोजन
- घरगुती वापरासाठी नाममात्र शुल्कात अत्यावश्यक वैद्यकीय उपकरणे
- बोरीवली येथे सामान्य व गोरगरीब जनतेसाठी बाह्य रुग्ण विभाग
- बोरीवली, ठाणे व परळ येथे फिजिओथेरपी केंद्र
- समुपदेशन केंद्र
- सामान्य जनतेसाठी विशेषत: महिलांसाठी वैद्यकीय जागरुकता कार्यक्रमांचे आयोजन
- ठाणे सिव्हिल रुग्णालयात नवजात बालकांना कपडे वाटप
- मसाज व योग वर्ग
- ॲक्सेस बार थेरपी
- रुग्णांना समितीच्या केंद्रावर जास्तीत जास्त लाभ मिळवून देण्यासाठी संसाधने, मालमत्ता, उपकरणे आणि मनुष्यबळ वाढविणे व सक्षम करणे.
- रुग्णांच्या उपचार प्रक्रियेमध्ये रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना शारीरिक व मानसिक आधार देणे.
- समितीचे सभासद, देणगीदार, हितचिंतक, कर्मचारी वर्ग तसेच पुरवठादार यांच्या अनुभवाने, कौशल्याने व सहकार्याने समितीच्या उपक्रमात उत्कृष्टता वाढविणे.
- समितीच्या कार्याचा आढावा, लाभार्थ्यांची आकडेवारी याची पारदर्शक माहिती सादर करणे.

# व्यवस्थापकीय समिती सदस्य
# २०२२-२०२३

| | | |
|---|---|---|
| १. | **डॉ. श्रीकांत बडवे** | अध्यक्ष |
| २. | **डॉ. हेमा कण्णन** (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) | उपाध्यक्षा |
| ३. | **डॉ. जयंत पटवर्धन** (डिसेंबर २०२२ पासून) | उपाध्यक्ष |
| ४. | **श्री. श्रीराम दांडेकर** (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) | कार्याध्यक्ष |
| ५. | **डॉ. परेश नवलकर** (डिसेंबर २०२२ पासून) | कार्याध्यक्ष |
| ६. | **श्री. प्रसन्न जोशी** (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) | कोषाध्यक्ष |
| ७. | **श्री. विवेक छत्रे** (डिसेंबर २०२२ पासून) | कोषाध्यक्ष |
| ८. | **श्री. अविनाश खरे** (जून २०२२ पर्यंत) | मानद् सचिव |
| ९. | **श्रीमती सुमेधा जोशी** (जुलै २०२२ पासून) | मानद् सचिव |
| १०. | **श्री. जनार्दन कढे** | सदस्य |
| ११. | **श्री. किरण करलकर** | सदस्य |
| १२. | **श्री. नितीन देशमुख** | सदस्य |
| १३. | **श्री. प्रविण परब** | सदस्य |
| १४. | **श्री. सतिश तांबा** (डिसेंबर २०२२ पासून) | सदस्य |
| १५. | **श्रीमती अरुणा सोमण** (डिसेंबर २०२२ पासून) | सदस्य |
| १६. | **श्रीमती स्मिता मोहळे** (डिसेंबर २०२२ पासून) | सदस्य |
| १७. | **श्रीमती स्मिता बेडेकर** | स्वीकृत सदस्य |
| १८. | **श्री. दिलीप केतकर** | स्वीकृत सदस्य |

## निमंत्रित

१. **डॉ. अमरबहादूर ठाकोर**
२. **डॉ. सुहास शहा**
३. **डॉ. प्रशांत अमोणकर**
४. **श्री. सुधाकर भाटोडेकर**
५. **श्री. कमलाकर शेट्टे**

# नाना पालकर स्मृती समिती

**(नोंदणी क्र. : एफ् २८७४)**

रुग्ण सेवा सदन, १५८, रुग्ण सेवा सदन मार्ग, डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.
दूरध्वनी : (०२२) २४१६ ४८९० / २४१० २१६७ / २४१८ ६७२४
E-mail : nanapalkar15@gmail.com ● Website : www.npss.org

- **गोखले डायलिसिस केंद्र**
  ९ वा मजला, रुग्ण सेवा सदन,
  १५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,
  डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.
  फोन : ०२२-२४१६४८९०

- **तुलसियानी स्पेशालिटी लॅबोरेटरी**
  ८ वा मजला, रुग्ण सेवा सदन,
  १५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,
  डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.

- **प्रभाकर कुटुंब कल्याण केंद्र**
  ८ वा मजला, रुग्ण सेवा सदन,
  १५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,
  डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.
  फोन : ०२२-२४१६४८९०

- **नाना पालकर चिकित्सालय**
  १ ला मजला, रुग्ण सेवा सदन,
  १५८, रुग्ण सेवा सदन मार्ग,
  डॉ. आंबेडकर रोड, परळ, मुंबई - ४०० ०१२.
  फोन : ०२२-२४१६४८९०

- **कै. डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना**
  ए-५, श्रद्धा शॉपिंग सेंटर, तळ मजला,
  जेरबाई वाडीया रोड,
  परळ, मुंबई - ४०० ०१२.

- **वैद्यकीय व पॅथॉलॉजी कलेक्शन केंद्र, प्रभादेवी**
  शॉप नं. ५, विकी अपार्टमेंट,
  पी. बाळू मार्ग, जुनी प्रभादेवी,
  मुंबई - ४०० ०२५.

- **बोरीवली केंद्र**
  प्लॉट नं. २३८, टी.पी.एस. रोड-III,
  बाभई, बोरीवली (प.),मुंबई - ४०० ०९१.
  मो. ९३२६३६३११३

- **सांताक्रुझ डायलिसिस केंद्र**
  द्वारा, महर्षि दधिचि हॉस्पिटल,
  सांताक्रुझ बस डेपो आणि रेल्वे स्टेशन जवळ,
  सांताक्रुझ (पू.), मुंबई - ४०० ०५५.

- **बोरीवली डायलिसिस केंद्र**
  एक्सर प्रसुतीगृह आणि दवाखाना,
  १ ला मजला, डी. डी. बोरगे मार्ग, एक्सर रोड,
  बोरीवली (प.), मुंबई - ४०० ०९२.
  मो. : ९३२१७९५८०५

- **बोरीवली केमोथेरपी केंद्र**
  गणेश सिद्धी -२, पहिला मजला,
  वजिरा नाका, बोरीवली (प.)- ४०० ०९२.

- **ठाणे केंद्र**
  फ्लॅट नं. १, बिल्डीग नं. ८२-अ,
  वृंदावन कॉम्पलेक्स, ठाणे (प.)- ४०० ६०१
  फोन : ७०४५१६४९८

- **ठाणे रुग्ण सेवा व फिजिओथेरपी केंद्र**
  फ्लॅट नं. ५-६, बिल्डीग नं. ९०,
  वृंदावन कॉम्पलेक्स, ठाणे (प.)- ४०० ६०१
  फोन : ०२२-२५३७९६३४

# मनोगत

सामर्थ्य आहे चळवळीचे । जो जो करील तयाचे ।
परंतु तेथे अधिष्ठान पाहिजे भगवंताचे ।।
– समर्थ रामदास

रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा हे व्रत मानून कोणत्याही फलाची अपेक्षा न करता सेवाभावी व समर्पित भावनेने केलेल्या कार्यामध्ये प्रत्यक्ष परमेश्वर उभा राहतो. समितीचे आजवरचे कार्य हे ''स्वप्नपूर्तीकडून उत्तुंग शिखराकडे'' असेच आहे. अर्थात् ५५ वर्षाच्या अविरत तपश्चर्येचेच हे फळ आहे.

नाना पालकर स्मृती समिती व टाटा मेमोरियल केंद्र यांचे अनेक दशकापासून ऋणानुबंध आहेत. समितीचे आजवरचे काम पाहता समितीने मुंबई उपनगरात कर्करोग रुग्णांसाठी केमोथेरपी केंद्र सुरु करावे अशी टाटा मेमोरीयल केंद्राची इच्छा होती. त्यांनी यासाठी सर्वतोपरी मदत करण्याची तयारी दर्शविली. येथेच केमेथोरपी केंद्राचे बीज रोवले गेले.

समितीच्या अथक परिश्रमातून बोरीवली येथे ''डे केअर केमोथेरपी केंद्र'' उभे राहिले. २ ऑक्टोबर २०२२ रोजी टाटा रुग्णालयाचे संचालक पद्मश्री डॉ. राजेंद्र बडवे यांच्या शुभहस्ते व अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत या अत्याधुनिक केमोथेरपी केंद्राचा लोकार्पण सोहळा संपन्न झाला.

टाटा रुग्णालयात केमोथेरपीच्या प्रतिक्षेत असलेल्या अनेक रुग्णांना येथे त्वरीत केमोथेरपी मिळणे शक्य होणार असून डहाणू, पालघर, वाडा, जव्हार ते बोरीवली-अंधेरी पर्यंतच्या कर्करोग रुग्णांना या केंद्राचा लाभ होणार आहे.

बहुतांश वेळेला स्त्रीला स्वतःच्या स्तनाचा कर्करोग झाला आहे हे कळतच नाही. जेव्हा कळते तेव्हा फार उशीर झालेला असतो. आज स्त्रियांमध्ये कर्करोगाचे प्रमाण सर्वात जास्त आहे. कर्करोगाचे त्वरीत निदान झाल्यास, कमी वेळेत, कमी खर्चात, कमी उपचारांमध्ये रुग्ण कर्करोग मुक्त होऊ शकतो. यासाठी स्त्रियांनी नियमितपणे वर्षातून किमान एकदा तपासणी करून घेणे गरजेचे आहे.

स्तनाच्या कर्करोगाचे निदान वेळेत होऊन त्वरीत उपचार व्हावेत या हेतूने समितीने ''रक्षिता'' हे स्तन कर्करोग तपासणी व जागरुकता अभियान सुरु केलेले आहे. अत्याधुनिक मोबाईल व्हॅनमध्ये असलेल्या थर्मलिटिक्स प्रणालीच्या सहाय्याने ही चाचणी केली जाते. मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातील विविध भागात प्रतिवर्षी ५,००० महिलांची चाचणी करण्याचे समितीचे उद्दिष्ट आहे.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात तीनही डायलिसिस केंद्रावर २०८ रुग्णांचे २८,७७१ इतके डायलिसिस करण्यात आले असून परळ व सांताक्रुझ केंद्रांवर महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजने अंतर्गत मोफत डायलिसिस करण्यात आले आहे. गोरगरीब-गरजू रुग्णांना दुर्धर आणि महागड्या शस्त्रक्रियांसाठी व औषधोपचारासाठी या आर्थिक वर्षात वैद्यकीय आर्थिक मदत उपकमांतर्गत १,८४९ गोरगरीब गरजू रुग्णांना रुपये ८८.३२ लाख रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. गेली २२ वर्षे समिती क्षयरुग्णांसाठी मदत करीत आहे. क्षयरुग्णांची तापसणी, त्यांना मोफत औषधे, मोफत रक्त तपासणी तसेच शिवडी क्षयरुग्णालयातील रुग्णांना खजूर वाटप असे उपक्रम समितीमार्फत राबविले जातात. केंद्र सरकारच्या 'क्षयरोगमुक्त भारत' अभियान अंतर्गत समितीची ''नि-क्षय मित्र'' म्हणून नोंदणी करण्यात आली असून या योजने अंतर्गत ५० क्षयरुग्णांना प्रत्येक महिन्याला मोफत धान्य वाटप केले जाते.

संकल्प करणे, त्याच्या पूर्ततेसाठी अथक परिश्रम करणे, तो पूर्ण करून समाजासाठी समर्पित करून पुन्हा नवे संकल्प हाती घेणे हे नाना पालकर स्मृती समितीसाठी नवीन नाही. यामुळेच समितीचे बहुआयामी कार्य सिद्ध झाले आहे. समितीची ही वाटचाल अशीच समृद्ध होत राहणार यात शंका नाही. पुढील वर्षात ठाणे येथे ठाणे महानगरपालिकेच्या सहकार्याने डायलिसिस केंद्र सुरु करण्याचा समितीचा मानस आहे.

सत्कारणी दान देणारे देणगीदार, विविध धर्मदाय संस्था, फाऊंडेशन्स, सामाजिक दायित्व निधी (CSR) माध्यमातून योगदान देणारे आमचे भागीदार, हितचिंतक, कार्यकर्ते व कर्मचारी वृंद या सर्वांचे अनमोल सहकार्य लाभले याचा मनापासून आनंद होतो व समाधानही मिळते. या सर्वांचे कृतज्ञतापूर्वक आभार!

आपली,
**सुमेधा जोशी**
मानद् सचिव

# संदेश......

नाना पालकर स्मृती समिती मागील साडेपाच दशकांपासून अविरतपणे रुग्ण सेवेचे कार्य करीत आहे. ''रुग्णसेवा हीच ईश्वर सेवा'' हा नाना पालकरांनी दिलेला विचार घेऊनच समितीची स्थापना करण्यात आली. मागील ५५ वर्षाच्या कार्याचे सिंहावलोकन करताना आपण आश्चर्यचकित होतो. समितीच्या वाटचालीत अनेक आजी-माजी पदाधिकारी, सभासद यांचे अथक परिश्रम आहेत.

समितीच्या ५५ वर्षाच्या जडणघडणीत अनेक ज्येष्ठ मंडळींचा सहभाग राहिला आहे. अनेक नवीन मंडळी समितीशी जोडली गेली, याचा आनंद आहेच. पण त्याचबरोबर आपण काही सुह्रदांना निरोप ही दिला - तेव्हा वेदनाही झालेल्या आहेत. मागच्या वर्षीच समितीचे माजी सचिव श्री. कृष्णाजी छत्रे यांचे वृद्धापकाळाने निधन झाले. तसेच समितीमध्ये कार्यरत असणारे तरुण व्यक्तिमत्त्व व समितीचे सचिव श्री. अविनाश खरे यांचे अकस्मिक निधन झाले. यांच्या जाण्याने न भरणारी पोकळी निर्माण झाली. या सर्वांना विनम्र आदरांजली. या सर्व व्यक्ती कार्यरूपाने समिती सोबत कायम आहेतच.

समितीच्या दैनंदिन कामामध्ये कर्मचारी वर्गाचा सहभाग फार मोठा असतो. समितीच्या कार्यामध्ये कर्मचाऱ्यांचे श्रमही महत्त्वाचे आहेत. कोरोना काळात समितीचे सर्व उपक्रम सुरळीतपणे सुरू होते ते केवळ कर्मचाऱ्यांच्या सहभागामुळेच. सर्व कर्मचारी हे बेनीचे शिलेदार आहेत. समितीने त्यांच्या कार्याचा यथोचित सन्मानही केला.

श्री अविनाश खरे यांच्या निधनानंतर समितीच्या सचिव पदाची जबाबदारी श्रीमती सुमेधा जोशी यांनी स्वीकारली व सर्वांच्या सहकार्याने ती लिलया पार पाडत आहेत. याच काळात समितीच्या उपाध्यक्षा, कार्याध्यक्ष व खजिनदार यांनी कार्यकारिणी सदस्याचा राजीनामा दिला. समितीसाठी निश्चितच हा मोठा धक्का होता. मानसिक आणि व्यावहारिक पडझड झालीच. हे ईश्वरी कार्य आहे, कोणी ना कोणी पुढे येणारच हे माहीत असले तरीही. या वेळी डॉ जयंत पटवर्धन, डॉ परेश नवलकर व श्री विवेक छत्रे यांना अनुक्रमे उपाध्यक्ष, कार्याध्यक्ष व खजिनदार अशी जबाबदारी देण्यात आली. या सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन व धन्यवाद. समितीच्या विचारधारेत व परंपरेत वाढलेले नवीन कार्यकारणी सदस्य, निमंत्रित सदस्य समितीशी जोडले गेले. नवीन कार्यकारिणीने कार्यभार स्विकारून समितीची पुढील वाटचाल सुरू ठेवली आहे.

रुग्ण सेवा सदनास १३ एप्रिल२०२२ रोजी २५ वर्ष पूर्ण झाली. आज समितीची परळ, सांताक्रुझ व बोरीवली अशी ३ डायलिसिस केंद्र कार्यरत असून परळ व सांताक्रुझ ही दोन्ही डायलिसिसी केंद्र महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजनेमध्ये अंगीकृत करण्यात आली. याचा डायलिसिस रुग्णांना फार मोठा लाभ होत आहे.

याच वर्षात समितीने २ ऑक्टोबर २०२२ रोजी बोरीवली येथे १६ बेडचे डे केअर केमोथेरपी क्लिनिक सुरु केले. यासंदर्भात समितीने टाटा मेमोरियल केंद्र यांच्यासोबत सामंजस्य करार केलेला आहे. वैद्यकीय क्षेत्रातील एक पथदर्शी प्रकल्प म्हणून याकडे बघितलं जात आहे. समितीचे निमंत्रित सभासद व कोटक ग्रुपचे संचालक डॉ सुहास शहा यांच्या सहकार्याने या प्रकल्पासाठी कोटक महिंद्रा बँक यांच्याकडून भरीव अर्थसहाय्य प्राप्त झाले.

तसेच डॉ सुहास शहा यांच्या प्रयत्नांतून समितीस कोटक लाइफ इन्शुरन्स यांच्या सामाजिक दायित्व निधी (CSR) अंतर्गत स्तन कर्करोग तपासणी करण्यासाठी थर्मालिटीक्स प्रणालीने सुसज्ज अशी अद्यावत मोबाईलव्हॅन दिलेली आहे. या व्हॅनच्या सहाय्याने मुंबई, मुंबई उपनगर व आजूबाजूच्या शहरात महिलांसाठी स्तन कर्करोग तपासणी व जागरूकता अभियान राबविले जात आहे. १३ एप्रिल२०२३ रोजी परळ येथील रुग्णसेवा सदनात फिजिओथेरपी केंद्रही सुरू करण्यात आले.

हे सर्व आपल्याला ज्ञात झाले आहेच. त्याबरोबरच आणखी एक प्रेमळ आग्रह... आपणही, या सर्व कार्यपूर्ती साठी लागणाऱ्या निधी संकलनात हातभार लावू शकताच. तसेच संस्थेतर्फे चालणाऱ्या अन्य कुठल्याही उपक्रमात आपण अंशतः काही जबाबदारी घेऊ शकत असल्यास, सक्रिय होऊ शकत असल्यास,तसे आवर्जून आम्हाला कळवावे आपले स्वागतच आहे. आपल्या मौलिक सूचनाही मिळतीलच....

धन्यवाद !

**कार्यकारीणी समिती**
**नाना पालकर स्मृती समिती**

''रुग्ण सेवा हीच ईश्वर सेवा'' हे व्रत हाती घेऊन नाना पालकर स्मृती समिती मार्फत विविध प्रकारचे समाजोपयोगी उपक्रम प्रतिवर्षी राबविण्यात येतात. उपक्रमांची आखणी व अंमलबजावणी करण्यासाठी नेमलेल्या कार्यकारी समितीच्या १४ सभा यावर्षी घेण्यात आल्या व विविध विषयांवर चर्चा होऊन निर्णय घेण्यात आले.

वार्षिक हिशेबाची तपासणी, वैधानिक हिशेब तापसनीस मे. वैशंपायन ॲन्ड असोसिएट्स, सनदी लेखापाल यांच्याकडून झाली असून त्याचा अहवालही कार्यकारिणी समिती समोर ठेवण्यात आला. समितीची वेबसाईट www.npss.org असून ती वेळोवेळी अद्ययावत करून घेण्यात आली आहे.

वित्त कायदा २०२० द्वारे नवीन तरतुदीनुसार प्राप्तीकर कायदा १९६१ च्या अंतर्गत 12 A व 80 G चे नुतनीकरण करण्यात आलेले असून 12 A चा नोंदणी क्रमांक AATN2310GE20214 व 80 G चा नोंदणी क्रमांक AATN2310GF20214 असा आहे. तसेच कंपनी कायदा, २०१३ च्या सामाजिक उत्तरदायित्व धोरण (CSR) सुधारणा नियमांनुसार CSR-1 अंतर्गत नोंदणी केलेली असून त्याचा नोंदणी क्रमांक CSR00001230 आहे. आयकर कायद्याच्या नियमानुसार समितीस प्राप्त झालेल्या देणगीसंदर्भातील माहिती फॉर्म 10 BD च्या स्वरूपात आयकर विभागाच्या पोर्टलवर देण्यात आली असून देणगीदारांना फॉर्म 10 BE च्या स्वरुपात प्रमाणपत्र देण्यात आले.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात कार्यकारी समितीच्या १४ सभा झालेल्या असून त्या पुढीलप्रमाणे -: २३ एप्रिल २०२२, २८ मे २०२२, २५ जून २०२२, २ जुलै २०२२, २३ जुलै २०२२, १७ ऑगस्ट २०२२, २७ ऑगस्ट २०२२, २४ सप्टेंबर २०२२, २२ ऑक्टोबर २०२२, २६ नोव्हेंबर २०२२, २५ डिसेंबर २०२२, २८ जानेवारी २०२३, २५ फेब्रुवारी २०२३, २५ मार्च २०२३.

| अनु. क्र. | कार्यकारिणी सदस्य | पदनाम | उपस्थित सभा संख्या |
|---|---|---|---|
| १. | **डॉ. श्रीकांत बडवे** | अध्यक्ष | ०९ |
| २. | **डॉ. हेमा कण्णन** (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) | उपाध्यक्षा | ०६ |
| | **डॉ. जयंत पटवर्धन** (डिसेंबर २०२२ पासून) | उपाध्यक्षा | ०८ |
| ३. | **श्री. श्रीराम दांडेकर** (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) | कार्याध्यक्ष | ०६ |
| | **डॉ. परेश नवलकर** (डिसेंबर २०२२ पासून) | कार्याध्यक्ष | ०६ |
| ४. | **श्री. प्रसन्न जोशी** (ऑक्टोबर २०२२ पर्यंत) | कोषाध्यक्ष | ०६ |
| | **श्री. विवेक छत्रे** (डिसेंबर २०२२ पासून) | कोषाध्यक्ष | ११ |
| ५. | **श्री. अविनाश खरे** (जून २०२२ पर्यंत) | मानद् सचिव | ०२ |
| | **श्रीमती सुमेधा जोशी** (जुलै २०२२ पासून) | मानद् सचिव | १४ |
| ६. | **श्री. जनार्दन कढे** | सदस्य | ०३ |
| ७. | **श्री. किरण करलकर** | सदस्य | ०८ |
| ८. | **श्री. नितीन देशमुख** | सदस्य | ०८ |
| ९. | **श्री. प्रविण परब** | सदस्य | १४ |
| १०. | **श्री. सतिश तांबा** (डिसेंबर २०२२ पासून) | सदस्य | ०१ |
| ११. | **श्रीमती अरुणा सोमण** (डिसेंबर २०२२ पासून) | सदस्य | ०४ |
| १२. | **श्रीमती स्मिता मोहळ** (डिसेंबर २०२२ पासून) | सदस्य | ०१ |
| १३. | **श्रीमती स्मिता बेडेकर** | स्वीकृत सदस्य | ०४ |
| १४. | **श्री. दिलीप केतकर** | स्वीकृत सदस्य | १० |

# प्रगतीदर्शक वाटचाल

१९६८ **नाना पालकर स्मृती समिती :** १ मार्च, १९६८

असाध्य रोगाने पीडित, गरीब रुग्णांची यथाशक्ती सेवा करण्याच्या भावनेतून १ मार्च १९६८ रोजी समितीची स्थापना करण्यात आली. समाजातील गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांच्या उपचारा दरम्यान आधार, मार्गदर्शन व सर्व शक्य वैद्यकीय मदत देण्याच्या उद्देशाने समितीने सेवाकार्याला सुरुवात केली. समाजाची आरोग्याच्या दृष्टीने निकड विचारात घेता पुढील काळात समितीने अनेक समाजोपयोगी उपक्रम सुरू केले. आज हे सर्व उपक्रम रुग्णांना आधारवड ठरले आहेत.

गंभीर रोगावरील उपचारांसाठी अनेक रुग्ण देशाच्या कानाकोपऱ्यातून मुंबईत उपचारांसाठी येत असतात. बहुतेकदा हा त्यांच्यासाठी क्लेशकारक तथा विस्मयकारक अनुभव असतो. कारण यातील अनेकजण अत्यंत गरीब असून पहिल्यांदाच मुंबईत आलेले असतात. त्यांचे मार्गदर्शन करण्यासाठी मुंबईत त्यांचे कोणतेही मित्र किंवा नातेवाईक नसतात. या परिस्थितीत समिती त्यांना परळ विभागात निःशुल्क निवास व्यवस्था उपलब्ध करून देते. रुग्ण व त्याच्या नातेवाईकांना "घरापासून दूर - परंतु आपले घर असावे व वाटावे'' ही संकल्पना. त्यांना रुग्णालय आणि वैद्यकीय प्रक्रियेबद्दल अभिमुखता प्रदान करून अनेक अडचणींवर मात करण्यास मदत करते. समितीने सुरुवातील केईएम रुग्णालयाजवळील एका लहान खोलीत रुग्णांना निवारा देण्यास सुरवात केली. ही सुविधा अत्यंत कमी प्रमाणात म्हणजे चार रुग्ण व त्यांचे नातेवाईक अशी सुरु झाली. आज त्याचा विस्तार ७६ रुग्ण व त्यांचे नातेवाईक असे मिळून साधारण २२८ लोकांच्या राहण्याची विनामूल्य व्यवस्था केली जाते.

१९७३ **संस्थेचे नोंदणीकरण :** ४ मे, १९७३

नाना पालकर स्मृती समिती ही धर्मादाय संस्था सन १९६८ साली स्थापन झाली असून सार्वजनिक धर्मादाय विश्वस्त कायदा १९५० तथा सोसायटी नोंदणी अधिनियम कायदा १९३० अंतर्गत धर्मादाय आयुक्तालय, मुंबई यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेली आहे.

१९९० **नाना पालकर स्मृती समिती ची बोरीवली शाखा :** १७ जून, १९९०

स्व. श्रीमती वत्सला रेगे यांनी समितीला दान केलेल्या जागेमध्ये १७ जून १९९० रोजी बोरीवली केंद्राची सुरुवात झाली. या केंद्रामध्ये रुग्णोपयोगी वस्तू म्हणजे फाउलर बेड, व्हीलचेअर, कमोड चेअर, वॉटर बेड, ऑक्सिजन मशिन्स आदी वस्तू नाममात्र दरात गरजवंताना वापरसाठी दिल्या जातात. तसेच अनेक व्याधीसाठी अनुभवी डॉक्टरांकडून नाममात्र दरात बाह्य रुग्ण विभाग चालविला जातो. याशिवाय केंद्राच्या परिसरातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या भागात, तसेच शाळांमधून मोफत वैद्यकीय आरोग्य शिबिराचे आयोजन केले जाते. रक्तदानाचे महत्त्व लक्षात घेऊन या केंद्रामार्फत वर्षातून एकदा रक्तदान शिबिराचे आयोजन केले जाते. केंद्रामार्फत वैद्यकीय सेवा देण्याचे कार्य अविरत वर्धिष्णूपणे सुरू आहे.

१९९७ **रुग्ण सेवा सदन :** १३ एप्रिल १९९७

''स्वप्नपूर्ती चा दिवस''. मुंबई महानगर पालिकेकडून परळ येथे भाडे पट्टयाने एक भूखंड प्राप्त झाला. यावर रुग्ण सेवा सदनाची ७ मजली इमारत अथक परिश्रमातून उभी राहिली. परम पूज्य श्री पांडुरंग शास्त्री आठवले यांच्या शुभहस्ते ''रुग्णा सेवा सदन'' चे औपचारिक उद्घाटन झाले. या सोहळ्यास राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरसंघचालक, श्री राजेंद्र सिंहजी उर्फ "रज्जू भैया'' उपस्थित होते. सुरुवातीला, रुग्णांची संख्या सरासरी साधारणपणे पंधरा होती परंतु जेव्हा सर्व सुविधा उपलब्ध झाल्या तेव्हा ६० रुग्ण व त्यांचे १२० नातेवाईक इतक्या लोकांची निवास व्यवस्था सदनात होऊ लागली. रुग्ण अल्प काळासाठी आपल्या पीडा विसरू शकेल यासाठी योग्य वातावरण देखील आवश्यक असते. अशा प्रसंगी आपण एकचित्त होऊन ईश्वराला शरण जातो. यासाठी सदनाच्या तळ मजल्यावरील दालनात गणरायाच्या मूर्तीची विधिवत स्थापना करण्यात आली.

**उपहार गृह :** १९ जून, १९९७

सदनातील सर्वांनाच नुसती निवास व्यवस्था देऊन भागण्यासारखे नव्हते. येणाऱ्या सर्वांना भोजन, चहा-पान, न्याहारी वगैरे व्यवस्थित मिळावी या हेतूने उपहारगृह सुरु करण्यात आले. सदनाच्या तिसऱ्या मजल्यावर उपहारगृह सुरु केले. सदनात येणारे रुग्ण व त्यांचे नातलग यांची ही गरज संस्थेने पूर्ण केली. रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना १० रुपयात जेवण व ५ रुपयात न्याहरीची व्यवस्था करण्यात आली.

१९९८ **रक्तदान शिबिर :** ३ मार्च, १९९८

''रक्तदान - श्रेष्ठ दान.'' रुग्णांच्या सेवेचे व्रत घेतलेल्या नाना पालकर स्मृती समितीने रक्तदानाचे महत्त्व जाणले आणि रक्तदान शिबिराचे आयोजन करुन आणखी एका रुग्णोपयोगी कार्यास सुरुवात केली. स्वेच्छेने रक्तदान करणाऱ्या अनेक रक्तदात्यांची सुची समितीकडे आहे. दिवस-रात्र विविध रक्तपेढ्याशी संपर्क वाढवून रुग्णांना रक्त मिळवून देणे, तसेच रक्तदाता उभे करणे हे कार्य जोरात सुरु झाले. आज समिती तर्फे वर्षातून किमान तीन रक्तदान शिबिरे आयोजित केली जातात. परळ, बोरीवली व मुंबई सेंट्रल अश्या ठिकाणी हे काम सुरु आहे. तातडीची सोय म्हणून समितीचे कार्यकर्ते दुरध्वनीवर संपर्क करून रक्तदाता व रुग्ण यांची भेट घालून देतात व त्याची रक्ताची गरज पुरविली जाते.

**रुग्णवाहिका सेवा :** ३१ डिसेंबर, १९९८

रुग्णांची सेवा करताना रुग्णवाहिका असणे आवश्यक असते. रुग्णांना रुग्णालय ते सदन, एका रुग्णालयातून दुसऱ्या रुग्णालयात घेऊन जाणे, बाहेरच्या रुग्णांना स्टेशनवरून आणणे अथवा स्टेशनवर सोडणे इत्यादीसाठी रुग्णवाहिकेचा उपयोग होतो. यासाठी समितीने रुग्णवाहिकेची सेवा सुरू केली. सदनातील रुग्णासाठी ही सेवा विनामूल्य दिली जाते. याव्यतिरिक्त बाहेरील रुग्णांना अत्यंत नाममात्र दरात रुग्णवाहिका सेवा उपलब्ध करून दिली जाते.

२००० **मधु औषध पेढी / रुग्णांना वैद्यकीय आर्थिक मदत :**

रुग्णाच्या आजाराचे स्वरूप, त्यासाठी येणारा खर्च, त्याची आर्थिक क्षमता लक्षात घेऊन रुग्णाला मदत केली जाते. यासाठी समितीने स्वतंत्र निधीची तरतूद केलेली आहे. शहरातील सरकारी रुग्णालयात उपचार घेणाऱ्या गरीब आणि गरजू रुग्णांना त्यांचे उपचार आणि शस्त्रक्रियेसाठी आर्थिक सहाय्य केले जाते.

**अन्नपूर्णा योजना :**

कर्करोगाचा उपचार वेदनादायक आणि रुग्णाला दुर्बल करणार आहे. या रुग्णांना प्रतिकार शक्ती वाढविण्यासाठी आणि उपचाराचे दुष्परिणाम कमी करण्यासाठी पौष्टिक आहाराची आवश्यकता आहे. रुग्ण गरीब कुटूंबातील असल्याने २-३ व्यक्तींचा अन्नाचा खर्च त्यांना परवडत नाही. मग ते रस्त्याच्या कडेला अन्न घेतात जे अस्वच्छ असते. या समस्येवर मात करण्यासाठी समितीने सदनाच्या तिसऱ्या मजल्यावर उपाहारगृहाची सुविधा सुरू केली. समितीने देणगीदारांच्या मदतीने रुग्ण सेवा सदनात रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना अन्नपूर्णा योजने अंतर्गत सकाळ-संध्याकाळचे भोजन व सकाळची न्याहारी फक्त रु. २५ या नाममात्र दरात देण्यास सुरुवात केली. तसेच अन्नपूर्णा योजने अंतर्गत खालील उपक्रम राबविले जातात.

- समितीतर्फे रोज टाटा रुग्णालयाच्या पदपथावरील रुग्णांच्या नातलगांना २८० कप चहा दिला जातो. यासाठी गुरुनानी सती चॅरिटेबल ट्रस्ट यांचे आर्थिक सहाय्य लाभले आहे.
- वाडीया बाल रुग्णालयातील बाल रुग्णांच्या मातांना १०० कप चहा दिला जातो. तसेच वाडीया रुग्णालयात दाखल केलेल्या ३०० बाल रुग्णांना संध्याकाळचा नाष्टा दिला जातो. यासाठी गौरीशंकर छितरमल मिठाईवाले यांचे आर्थिक सहाय्य लाभले आहे.
- वाडीया बाल रुग्णालयातील सुमारे ५० मातांना व के. ई. एम. मधील सुमारे १५० रुग्णांच्या नातेवाईकांना पोळी भाजी दिली जाते. यासाठी रोटरी क्लब नरीमन पॉईंट यांचे अर्थसहाय्य लाभले आहे.

२००१ **रुग्ण सेवा सदन मार्ग :** मे २००१

ज्या ठिकाणी रुग्ण सेवा सदन दिमाखात उभे आहे, त्या रस्त्याचे जुने नाव चमारबाग क्रॉस स्ट्रीट असे होते. समितीच्या उत्तम कार्याकडे पाहून या रस्त्याचे नामकरण "रुग्ण सेवा सदन मार्ग'' करण्यात आले. समितीच्या उत्तम कार्याची ही पावतीच आहे.

**फळ वाटप योजना :** जानेवारी २००१

दर गुरुवारी समितीमार्फत शिवडी येथील क्षयरोग रुग्णालयातील सर्व रुग्णांना ५ ते ६ फळांचे वाटप केले जात होते. कोरोना नंतर महिन्यातून दोनदा खजूर वाटप सुरु करण्यात आले आहे.

**मसाज प्रशिक्षण वर्ग :** जानेवारी २००१

मसाज ही एक प्राचीन मान्यताप्राप्त भारतीय कला आहे. शास्त्रशुद्ध मसाजमुळे अनेक व्याधी आटोक्यात आणता येतात. या कलेचे शिक्षण व माहिती प्रात्यक्षिकांसह शनिवार-रविवारच्या वर्गामधून दिली जाते. चार शनिवार व चार रविवार, संध्याकाळी ४ ते ८ असा एक महिन्याचा वर्ग प्रात्यक्षिकांसह तज्ञ व अनुभवी प्रशिक्षकांकडून चालविला जातो. वैद्य श्री. प्रकाश दळवी हे सध्या मसाज कलेचे प्रशिक्षण देत आहेत.

**योग वर्ग :**

मानसिक व शारिरीक स्वास्थ्य टिकवून वृद्धिंगत करण्याची विश्वमान्यता मिळालेली भारतीय पध्दती म्हणजे योग. योगाभ्यासातून मन व शरीर स्वस्थ ठेवता येतेच परंतु धार्मिक पातळीवरही स्वतःला प्रस्थापित करता येते. आजच्या धकाधकीच्या जीवनात योग मन व शरीर स्वास्थ्य देऊ शकतो. नाना पालकर स्मृती समितीने ''योग विद्या निकेतन'' यांच्या सहकार्याने सदनात योग वर्गाचे आयोजन सुरु केले. सोमवार ते शुक्रवार सायं. ४.३० ते ८.०० या वेळेत योग वर्ग चालवले जातात. योग विद्या निकेतन तर्फे श्री. आर. पी. पाटील व श्रीमती निलीमा रेळे हे अनुभवी व तज्ज्ञ योग शिक्षक मार्गदर्शन करतात. तसेच सदनातील रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना सोमवार, मंगळवार, गुरुवार शुक्रवार या दिवशी योगशिक्षिका श्रीमती वंदना शिंत्रे यांच्याकडून योगाभ्यास शिकविला जातो.

**'रुग्ण मित्र' - त्रैमासिक :** २५ मार्च, २००१

रुग्ण मित्र हे त्रैमासिक समिती मार्फत प्रकाशित केले जात असून समितीशी संलग्न असलेले सभासद, देणगीदार आणि हितचिंतकांना हा अंक विनामूल्य पाठवला जातो. रुग्ण मित्र या त्रैमासिकात समितीचे विविध उपक्रम व येणारे नवे उपक्रम, तीन महिन्यात घडलेल्या विशेष घटना यांची माहिती दिली जाते. श्री. भालचंद्र बोपर्डीकर हे या त्रैमासिकाच्या संपादकाचे काम पाहत होते. त्यांच्या निधनानंतर श्री. विवेक कृष्णाजी छत्रे हे संपादकाचे काम पहात असून श्रीमती निता नाग या कामात सहकार्य करीत आहेत.

**क्षयरोग उपचार केंद्र :** १५ ऑगस्ट, २००१

मुंबई शहरामध्ये दूषित हवेमुळे क्षयपिडीत रुग्णांची संख्या वाढत आहे. बहुसंख्य क्षयरुग्ण अर्थिक दुर्बल गटातील असल्याने औषध खर्च आवाक्याबाहेरचा असतो. हा विचार करून समितीने अनुभवी क्षयरोग तज्ज्ञ डॉ. कमलाकर कुलकर्णी यांची नियुक्ती केली आहे. ते आठवड्यातून एक दिवस सदनात येऊन रुग्णांची तपासणी करतात व रुग्णांना मोफत औषधे दिली जातात.

२००२ **रुग्ण सेवा दिन :** २० एप्रिल, २००२

नाना पालकर यांच्या जन्मदिना निमित्ताने दरवर्षी 'रुग्ण सेवा दिन' साजरा केला जातो. समाजात विशिष्ट ध्येय ठेवून स्वतःच्या समाधानासाठी तसेच प्रसिद्धीची अपेक्षा न ठेवता काही व्यक्ती आरोग्य क्षेत्रात परिवर्तनाचे काम करत असतात. अशा व्यक्तींना प्रोत्साहन देणे ही सामाजिक जबाबदारी आहे. याच उद्देशाने समिती मार्फत या दिवसाचे औचित्य साधून आरोग्य क्षेत्रात लक्षणीय काम करणाऱ्या व्यक्तींचा ''सेवाव्रती पुरस्कार'' देवून सन्मान केला जातो.

२००३ **प्रभाकर कुटुंब कल्याण केंद्र :** १६ मार्च, २००३

समितीच्या बहुआयामी सेवाकार्याला एक नवा आयाम जोडावा या कल्पनेने 'प्रभाकर कुटुंब कल्याण केंद्र' सुरू झाले. समाजातील अनेक व्यक्तींना HIV/AIDS सारख्या व्याधींनी ग्रासले असल्याचे आपण पाहतो. त्याचबरोबर कर्करोग, किडनी चे आजार, मधुमेह इत्यादी आजारांनी समाजातील घटक बाधित आहेत. या लोकांच्या अडचणी समक्ष जाणून योग्य तो सल्ला या केंद्रामध्ये दिला जातो. श्रीमती मती महेंद्र या केंद्रामध्ये समुपदेशनाचे काम पाहतात.

**नाना पालकर चिकित्सालय :** २९ सप्टेंबर, २००३

नाना पालकर स्मृती समितीतर्फे सदनातच सामान्य जनतेसाठी बाह्य रुग्णांची तज्ज्ञ डॉक्टरांकडून तपासणी केली जाते व योग्य उपचार आणि औषधे देण्याची सोय रुग्णसेवा सदनातच केलेली आहे.

२००४ **डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना :** २२ फेब्रुवारी, २००४

सामान्य व गोर-गरीब जनतेसाठी वैद्यकीय सल्ला, औषधे, इंजेक्शन अत्यंत नाममात्र दरात उपलब्ध व्हावी म्हणून टाटा हॉस्पिटल समोर श्रद्धा इमारतीमध्ये नाना पालकर स्मृती समिती मार्फत ''डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना'' चालविला जातो. सन २००४ साली श्रीमती डॉ. शैलजा लवेकर यांनी, आपले दिवंगत पती कै. डॉ. शिवानंद लवेकर यांचा दवाखाना समितीला वैद्यकीय सेवेसाठी विनामूल्य दिला . डॉ. मयुर जोगीदासनी या तज्ज्ञ, अनुभवी व सेवाभावी डॉक्टरांच्या सहयोगाने सल्ला व उपचार या दवाखान्यात दिले जातात.

**रुग्ण सेवा सदनाचे वाढीव तीन मजले :** ३० मार्च, २००४

समितीचे बहुआयामी सेवाकार्य विचारात घेऊन महानगरपालिकेने सदनाच्या इमारतीवर आणखी तीन मजले उभारण्याची परवानगी दिली. रुग्ण सेवा सदनाची १० मजली वस्तू आज दिमाखात उभी आहे. या तीन मजल्यांचे उद्‌घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे तत्कालीन सरसंघचालक परमपूज्य के. सुदर्शनजी यांच्या शुभहस्ते झाले.

**गोखले डायलिसीस केंद्र :** १३ जून, २००४

मानवी शरीरातील मुत्रपिंड निकामी झाल्यावर त्या व्यक्तींना नियमीत डायलिसीस करणे आवश्यक असते. डायलिसीस ही एक खर्चिक उपचार पद्धती आहे. रुग्ण सेवा सदनाच्या ९ व्या मजल्यावर डायलिसीस सेवा सुरु करण्याच्या दृष्टीने निर्णय घेण्यात आला. सुरुवातीला चार डायलिसीस यंत्र ''गोविंद दत्तात्रय गोखले चॅरिटेबल ट्रस्ट' यांनी देऊन डायलिसीस केंद्र सुरु करण्यासाठी सढळहस्ते मदतही केली. आज आपल्या डायलिसीस केंद्रामध्ये १४ डायलिसीस यंत्र असून तीन सत्रांमध्ये केंद्र कार्यरत आहे. डॉ. तुकाराम जमाले, डॉ. अहमद पठाण आणि डॉ. अतिम पजाई यांच्या मार्गदर्शनाखाली गोखले डायलेसीस केंद्र सुरु आहे.

२००६ **तुलसियानी रक्त तपासणी केंद्र :** १ एप्रिल, २००६

रुग्ण सेवा सदनच्या ८ व्या मजल्यावर 'सुमन रमेश तुलसियानी स्पेशालिटी लॅबोरेटरी' ही अत्याधुनिक रक्त तपासणी प्रयोगशाळा तुलसियानी उद्योजक कुटुंबाच्या आर्थिक सहाय्यातून सुरु करण्यात आली. अत्याधुनिक यंत्रांवर सर्व प्रकारच्या रक्त तपासण्या या प्रयोगशाळेत केल्या जातात. या केंद्रात अत्यल्प दरात रक्त तपासणी केली जाते. डॉ. प्रशांत आमोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली हे रक्त तपासणी केंद्र कार्यरत आहे. सदनात राहणारे रुग्ण, डायलिसीस रुग्ण तसेच सर्व सामान्य व गोर-गरीब जनतेस तुलसियानी रक्त तपासणी केंद्र वरदान ठरत आहे.

२००८ **ठाणे केंद्र :** २० एप्रिल, २००८

सेवाभावी कार्यकर्त्यांच्या अथक प्रयत्नातून नाना पालकर स्मृती समिती ने ठाण्यात आणखी एक केंद्र सुरु केले. कै. राजा वैद्य यांनी ठाण्यात अन्य सहकार्यांच्या मदतीने गरीब गरजू रुग्णांना मदत करण्यास सुरुवात केली. या केंद्रातर्फे सरकारी सुतिकागृहात जन्मलेल्या नवजात बालकांना प्रत्येक महिन्याला कपड्यांचे वाटप केले जाते. सरकारी रुग्णालयातील गरजू मातांना सकस आहाराचीही व्यवस्था केली जाते. थेऊर येथील गरीब विद्यार्थ्यांना शालोपयोगी साहित्य आणि सकस आहार दिला जातो. मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरेही आयोजित केली जातात. ज्येष्ठ नागरीक व रुग्णांना रुग्णोपयोगी वस्तू तात्पुरत्या स्वरुपात नाममात्र दरात घरी वापरण्यासाठी दिली जातात.

२०१० **राष्ट्रीय डॉक्टर दिन :** १ जुलै, २०१०

डॉक्टर बिधान चंद्र रॉय यांच्या स्मरणार्थ देशभर 'डॉक्टर्स दिन' साजरा केला जातो. या दिवसाचे औचित्य साधून समितीमार्फत विविध क्षेत्रात सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या डॉक्टरांचा सत्कार केला जातो. निःस्वार्थपणे समाजातील गरीब रुग्णांवर उपचार करणाऱ्या, विनाशुल्क शस्त्रक्रिया करणाऱ्या सेवाभावी डॉक्टरांचा शोध घेऊन दरवर्षी या दिवशी तीन डॉक्टरांचा सत्कार केला जातो. उदात्त हेतूने काम करणाऱ्या डॉक्टरांना समाजासमोर आणण्याचे व त्यांच्या कार्याचे कौतुक करण्याचे अविरत कार्य समिती करत आहे.

२०१३ **बोरीवली केंद्र नवीन वास्तूत :** - ६ ऑक्टोबर, २०१३

बोरीवलीचे खासदार मा. गोपाळ शेट्टी यांच्या प्रयत्नातून बोरीवली केंद्राला मोठी जागा उपलब्ध झाली. या केंद्रात रुग्णोपयोगी वस्तू अल्पदरात देण्याव्यतिरिक्त वैद्यकीय क्षेत्रात फार मोठे काम सुरु झाले. समाजातील गरीब व गरजू रुग्णांना माफक दरात रुग्ण सेवा व उपचार उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीकोनातून केंद्रामार्फत तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून बाह्य रुग्ण विभागाची सोय करण्यात आली आहे. विविध व्याधींवरील नामवंत डॉक्टर्स येथे येतात व त्यांची सेवा समाजाला अत्यल्प दरात उपलब्ध करून देतात. दंतचिकित्सा, कान-नाक-घसा, होमियोपॅथी, आयुर्वेदीक, फिजिओथेरपी यांसारख्या सेवा देखील या केंद्रावर उपलब्ध आहेत.

२०१८ **सांताक्रुझ डायलिसीस केंद्र :** १ जून, २०१८

नाना पालकर स्मृती समितीने 'संकल्प ट्रस्ट' च्या डायलिसीस केंद्राची जबाबदारी स्विकारली. १२ डायलिसीस यंत्र असलेले हे केंद्र आता समिती मार्फत चालविले जाते. समितीने या केंद्राची जबाबदारी घेतल्यानंतर आता हे केंद्र तीन सत्रात सुरु झाले आहे. इथेही समितीने गोर-गरीब रुग्णांसाठी डायलिसीस सेवा उपलब्ध केली आहे. या केंद्रामध्ये अल्प दरात रक्त तपासणी देखील केली जाते.

**ठाणे केंद्र येथे फिजिओथेरपी उपक्रमाची सुरुवात :** ऑक्टोबर २०१८

आजकालच्या तणावपूर्वक जीवनशैलीमुळे स्पॉंडीलायसिस, गुडघेदुखी, कंबर दुखी हे प्रश्न वाढत आहेत या दृष्टीने ठाणे केंद्रात सामान्य जनतेसाठी नाममात्र दरात फिजिओथेरपी कक्ष कार्यान्वित करण्यात आला.

**कै. नाना पालकर यांची जन्मशताब्दी व नाना पालकर स्मृती समितीचे सुवर्ण जयंती वर्ष:**

नाना पालकर यांची रुग्णांविषयीची तळमळ व त्यांनी केलेले रुग्णसेवेचे कार्य अखंडपणे चालू ठेवण्यासाठी सन १९६७ साली नाना पालकर स्मृती समितीची स्थापना करण्यात आली. सन २०१८-१९ हे नाना पालकर यांचे जन्मशताब्दी वर्ष व नाना पालकर स्मृती समितीचे सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरे करण्यात आले. २४ ऑगस्ट २०१८ रोजी या जन्मशताब्दी व सुवर्ण महोत्सवी वर्षाचा सांगता सोहळा आयोजित करण्यात आला. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक, डॉ. मोहनराव भागवत यांच्या हस्ते हा सोहळा समारंभपूर्वक संपन्न झाला. तसेच या कार्यक्रमास भारतातील राष्ट्रप्रेमी उद्योगपती श्री. रतन टाटा हे विशेष अतिथी लाभले हा एक दुग्धशर्करा योगच होता.

२०२० **महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना :** जुलै २०२०

समितीची परळ व सांताक्रुझ ही दोन्हीही डायलिसिस केंद्रे महाराष्ट्र शासनाच्या 'महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजने'मध्ये अंगीकृत करण्यात आली आहेत. या योजनेमुळे दोन्ही केंद्रामधील डायलिसिस रुग्णांना मोफत डायलिसिस सेवा प्रदान करण्यात येत आहे. गरीब व गरजू डायलिसिस रुग्णांना याचा फार मोठा लाभ होत आहे.

**बोरीवली डायलिसिस केंद्र :** १५ ऑगस्ट २०२०

सार्वजनिक खाजगी सहभाग प्रोत्साहन धोरणा अंतर्गत बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सार्वजनिक विभागामार्फत समितीस बोरीवली येथे १० वर्षाच्या कालावधीसाठी डायलिसिस केंद्राकरीता जागा देण्यात आली. दि. १५ ऑगस्ट २०२० रोजी या डायलिसिस केंद्राचा उद्घाटन समारंभ पार पडला व १० सप्टेंबर २०२० पासून डायलिसिस केंद्र नियमितपणे सुरु करण्यात आले.

२०२१ **नाना पालकर स्मृती समिती मार्ग, बोरीवली :** २५ डिसेंबर २०२१
समितीच्या बोरीवली येथील रुग्णसेवा केंद्रा समोरील रस्त्याला महानगर पालिकेमार्फत 'नाना पालकर स्मृती समिती मार्ग' असे नाव देऊन गौरविण्यात आले.

**'ध्यास सन्मान' पुरस्कार :**
ग्रंथाली आणि ॲडफीज यांच्यातर्फे समितीस 'ध्यास सन्मान' हा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

**'इंटरनॅशनल लाईफ सेव्हर अवॉर्ड'**
वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्स, इंग्लंड यांच्यातर्फे आयोजित रक्तदान शिबिरामध्ये सहभागी झाल्याबद्दल 'इंटरनॅशनल लाईफ सेव्हर अवॉर्ड'ने समितीस सन्मानित करण्यात आले.

२०२२ **ॲक्सेस बार थेरपी :** १० जुलै २०२२
रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन यांच्या सहकार्याने रुग्ण सेवा सदनातील कर्करोग रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना प्रत्येक रविवारी अनुभवी व तज्ञ फॅसिलिटेटर मार्फत मोफत ॲक्सस बार थेरपी दिली जाते.

**डे केअर केमोथेरपी क्लिनिक, बोरीवली :** ०२ ऑक्टोबर २०२२
समितीने टाटा मेमोरिअल केंद्र, मुंबई यांच्या सहयोगाने बोरीवली येथे अद्ययावत १६ बेडचे डे केअर केमोथेरपी क्लिनिक सुरु केले. ही सुविधा समाजाला अर्पण करण्याचा भव्य कार्यक्रम २ ऑगस्ट २०२२ रोजी संपन्न झाला. या केंद्रामुळे व होणाऱ्या व्यापक सुविधांमुळे कर्करोगग्रस्त रुग्णांची फार मोठी सोय झाली आहे.
रुग्णालयाचे बदलते स्वरूप आणि पारंपारिक रुग्णालयाची आवश्यकता नसलेल्या स्वतंत्र सुविधा उभारण्याचा वाढता कल व आश्यकता लक्षात घेऊन या केंद्राची निर्मिती करण्यात आली आहे.

२०२३ **'नि-क्षय मित्र' योजने अंतर्गत क्षयरोग रुग्णांना मदत :** १७ जानेवारी, २०२३
देशातून क्षयरोगाचे उच्चाटन करण्यासाठी केंद्रीय आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्रालयाने क्षयरोगमुक्त भारत करण्याचे उद्दिष्ट ठेवले असून यासाठी ''नि-क्षय मित्र'' योजना राबविली आहे. या योजने अंतर्गत क्षय रुग्णांच्या पोषण आहाराची जबाबदारी घेण्यात सामाजिक सहभाग वाढविला जात आहे.
केंद्र सरकारच्या या योजने अंतर्गत समितीची ''नि-क्षय मित्र'' म्हणून नोंदणी करण्यात आली आहे.

**वैद्यकीय व पॅथॉलॉजी कलेक्शन केंद्र, प्रभादेवी :** १ फेब्रुवारी, २०२३
बहादूरलाल अमृतलाल जैन चॅरीटेबल ट्रस्ट यांच्या सहयोगाने समितीने प्रभादेवी, मुंबई येथे वैद्यकीय व पॅथॉलॉजी कलेक्शन केंद्र सुरु केले.

**''रक्षिता'' - स्तन कर्करोग तपासणी व जागरुकता अभियान :** ३१ मार्च, २०२३
''उपचारांपेक्षा प्रतिबंध उत्तम'' यावर आमचा विश्वास आहे. यासाठीच समितीने कर्करोगाशी संबंधित प्रतिबंध आणि जागरुकता अभियान सुरु केले आहे. महिलांमध्ये स्तनाच्या कर्करोगाचे प्रमाण वाढत आहे. स्तनाच्या कर्करोगाचे वेळीच निदान झाल्यास कमी खर्चात योग्य उपचार होवून जीवनमान चांगले राहण्यास मदत होते.
स्तन कर्करोगाचे सुरुवातीच्या टप्प्यावर निदान करण्यासाठी समितीने अद्ययावत मोबाईल व्हॅन घेतली आहे. या अभियाना अंतर्गत मुंबई, मुंबई उपनगर, ठाणे, पालघर, रायगड या जिल्ह्यातील विविध भागात महिलांसाठी स्तन कर्करोग तापसणी व जागरुकता अभियान राबविण्यात येणार आहे. या अभियाना अंतर्गत प्रतिवर्षी ५,००० महिलांची चाचणी करण्यात येणार आहे.

**भावपूर्ण श्रद्धांजली :-** समितीचे माजी सचिव कै. कृष्णाजी छत्रे यांचे वृद्धपकाळाने निधन झाले. त्यांच्या जाण्याने समितीने एक दूरदृष्टी असलेले व चतुरस्त्र व्यक्तिमत्व कायमचे गमावले. समिती त्यांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.

# मुख्य आकडेवारी

## सन २०२२-२०२३

**''तुमची उदारता आम्हाला दरवर्षी एक लाखाहून अधिक लोकांची सेवा करण्यास सक्षम करते.''**

**रुग्ण सेवा सदन**
**११८२** रुग्ण आणि
**१७** राज्ये
(आजपर्यंत ४०,५९० लाभार्थी)

**वैद्यकीय मदत**
**१,८४९** रुग्ण आणि
रु. **८८.३२** लाख मदत
(आजपर्यंत २४,३९९ रुग्ण आणि रु. ९ करोड १९ लाख ३२ हजार मदत)

**तुलसियानी रक्त तपासणी केंद्र**
**१,८६,५८३** तपासण्या
**२७,०५४** रुग्ण
(१५,२६,८२६ तपासण्या आणि आजपर्यंत २,७९,१५० लाभार्थी)

**डायलिसिस केंद्र**
**(परळ, सांताक्रुझ, बोरीवली)**
**२८,७७१** डायलासिस आणि
(आजपर्यंत २ लाख ३० हजार ८६२ डायलासिस सेवा)

**रुग्णवाहिका सेवा**
**१३,५२७** रुग्ण
(आजपर्यंत १,२४,७३३ लाभार्थी)

**कै. शिवानंद लवेकर दवाखाना**
**६,५७४** रुग्ण आणि
(आजपर्यंत ९०,४७० लाभार्थी

**ठाणे केंद्र**
**रुग्णोपयोगी वस्तू**
**१,०३९** रुग्ण
(आजपर्यंत ६,६८७ लाभार्थी)

**बोरीवली केंद्र**
**बाह्यरुग्ण विभाग**
**१६,५२७** बाह्यरुग्ण
(आजपर्यंत १,०८,२०४ लाभार्थी)

**ठाणे केंद्र**
**फिजिओथेरपी**
**१,२४९** रुग्ण
(आजपर्यंत २,०४९ लाभार्थी)

**बोरीवली केंद्र**
**डे केअर केमोथेरपी क्लिनिक**
(२ ऑक्टोंबर २०२३ ते ३१ मार्च २०२३)
**१,५५२** केमोथेरपी

| क्र. | प्रकल्प तपशील | प्रती माह अपेक्षित खर्च | प्रती वर्ष अपेक्षित खर्च |
|---|---|---|---|
| १. | **रुग्ण सेवा सदन**<br>सदनामध्ये ३८ खोल्या असून प्रत्येक खोलीमध्ये २ रुग्ण व त्यांचे नातेवाईक अशा ६ व्यक्ति राहतात. यासाठी आम्ही दिवसाचे प्रतिकुटुंब रु. १०० घेतो. परंतु येथे येणाऱ्या रुग्णांपैकी ९५% रुग्ण हे अतिशय गरीब असतात, यामुळे आम्ही त्यांची येथे राहण्याची मोफत व्यवस्था करतो. यासाठी आम्हांला एका दिवसासाठी एका खोलीमागे रु. १०००/- इतका खर्च येतो. यामध्ये पाणी, वीज, मालमत्ता कर, कर्मचारी, साफसफाई, देखभाल इत्यादी खर्च समाविष्ट आहे. | ११.७६ लाख | १४१ लाख |
| २. | **डायलिसिस केंद्र (परळ, सांताक्रुझ, बोरीवली)**<br>परळ व सांताक्रुझ येथील दोन्ही डायलिसिस केंद्र ही महात्मा ज्योतीराव फुले आरोग्य योजनेमध्ये अंगीकृत असल्याने येथे डायलिसिस रुग्णांना मोफत डायलिसिस दिले जाते. बोरीवली येथील डायलिसिस रुग्णांकडून रु. ३५०/- प्रती डायलिसिस दर आकारला जातो. | १२.७० लाख | १५२ लाख |
| ३. | **वैद्यकीय मदत**<br>सध्याच्या काळात वैद्यकीय सेवा, शस्त्रक्रिया, औषधे इत्यादींचा खर्च दिवसें-दिवस वाढत असून गरीब कुटुंबांना हा खर्च परवडणारा नसतो. याकाळात रुग्ण व त्याचे कुटुंबिय प्रचंड आर्थिक व मानसिक तणावातून जात असतात. अशा परिस्थितीत त्यांना मिळणारी आर्थिक मदत अतिशय उपयुक्त असून त्यांच्यावरील आर्थिक ताण मोठ्या प्रमाणात कमी होतो. या पार्श्वभूमीवर समिती गेली १५ वर्षापासून गरीब व गरजू रुग्णांना वैद्यकीय मदत देत आहे. समिती देत असलेली वैद्यकीय मदत ही मागणीच्या तुलनेत खुपच कमी आहे. समितीच्या या उपक्रमासाठी जास्तीत जास्त निधी आवश्यक आहे. | १०.२८ लाख | १३५ लाख |
| ४. | **अन्नपूर्णा योजना**<br>अन्नपूर्णा योजने अंतर्गत सदनामध्ये राहणारे रुग्ण व त्यांचे नातेवाईक यांना नाममात्र दरात नाश्ता व जेवणाची व्यवस्था केली जाते. या योजने अंतर्गत त्यांना ५/- रुपयामध्ये न्याहरी व १०/- रुपयामध्ये जेवण दिले जाते. यासाठी समितीला प्रतिदिन रु.१५,०००/- इतकी आर्थिक कमतरता असते तसेच या योजने अंतर्गत वाडीया बाल रुग्णालयातील मुलांच्या मातांना दररोज पोळी-भाजीचे जेवण दिले जाते. | ४.७५ लाख | ५७ लाख |

| क्र. | प्रकल्प तपशील | प्रती माह आवश्यक रक्कम | प्रती वर्ष आवश्यक रक्कम |
|---|---|---|---|
| ५. | **क्षय रुग्णांना (TB) मदत**<br>क्षय रुग्णांना (TB) रुग्णालयातून घरी सोडल्यानंतर ४ ते ६ महिने औषधे घ्यावी लागतात. नियमितपणे तपासणी व औषधे न घेतल्यामुळे हा आजार अधिक बळावतो. यासाठी समितीच्या क्षयरोग चिकित्सा केंद्रामध्ये दर शुक्रवारी तज्ज्ञ अनुभवी डॉक्टरांकडून रुग्णाची तपासणी करून त्यांना विनामूल्य औषधे दिली जातात. | ५०,०००/- रुपये | ६ लाख |
| ६. | **फळ व खजूर वाटप**<br>शिवडी क्षयरोग रुग्णालयात प्रत्येक रुग्णाला खजुराचे वाटप केले जाते. तसेच वाडीया बाल रुग्णालयातील बालकांना देखील दर गुरुवारी फळांचे वाटप केले जाते. | १.५० लाख | १८ लाख |
| ७. | **रुग्णवाहिका सेवा**<br>सदनामध्ये राहणाऱ्या रुग्णांना विविध रुग्णालयात जाण्या-येण्यासाठी विनामूल्य रुग्णवाहिका सेवा उपलब्ध आहे. तसेच सर्वसामान्य जनतेला देखील ही सेवा नाममात्र दरात अथवा विनामूल्य उपलब्ध करून दिली जाते. इंधन, वाहनचालक व सेवकाचे वेतन, वाहन दुरुस्ती, विमा इत्यादी खर्च रुग्णवाहिका उपक्रमासाठी करावा लागतो. | ५०,०००/- रुपये | ६ लाख |
| ८. | **कै. डॉ. शिवानंद लवेकर दवाखाना**<br>समितीच्या तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांमार्फत सर्वसामान्य व गोर-गरीब रुग्णांना वैद्यकीय सल्ला, औषधे इत्यादी सेवा रु. १०/- इतक्या अत्यल्प दरात दिली जाते. पाणी, वीज, वेतन आणि देखभाल यांसह दवाखाना चालविण्यासाठी रु. ३ लाख इतका खर्च येतो. | ५५,०००/- रुपये | ६.६० लाख |
| ९. | **मोतीबिंदू शस्त्रक्रिया**<br>समितीच्या केंद्रामध्ये मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात येते. प्रत्येक महिन्याला साधारणपणे २० गरजू व गरीब रुग्णांवर मोतीबिंदू शस्त्रक्रिया केली जाते. एका शस्त्रक्रियेसाठी साधारणपणे रु. ५०००/- इतका खर्च येतो. | १.०० लाख | १२ लाख |

**निःस्वार्थी व सेवाभावी वृत्तीने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांच्या व समाजातून मिळणाऱ्या उदार आर्थिक सहाय्याच्या बळावर नाना पालकर स्मृती समितीचे काम चालू असते. आपल्या सक्रिय सहभागाचे स्वागत आहे. आपण दिलेली देणगी 80G सवलतीला पात्र असेल**

**बँक खात्याचे नांव** : नाना पालकर स्मृती समिती
**बँकेचे नांव** : बँक ऑफ बडोदा
**शाखा** : लालबाग, मुंबई
**बचत खाते क्रमांक** : **33380100001588**
आई एफ एस सी कोड : **BARB0LALBAU (५ वे अक्षर शून्य आहे)**

Great work carried out by dedicated team is very inspiring indeed. Genuine commitment to social service and giving high quality support to needy is visible in all initiatives of the institution. I wish all the best to management team for future. The visit was a humbling and learning experience.

**Prakash Apte**
Chairman, Kotak Mahindra Bank

I was unaware of a truly altruistic work happening so close to where I live. Truly overwhelmed by the work being done for needy patients. The cleanliness was something. I am truly impressed.

**Dr. Pallavi Prabhakar Saple**
Dean, J. J. Hospital, Mumbai

EXCELLENT…….EXCELLENT…….EXCELLENT…….
MAINTENANCE – SUPERB
CLEANLINESS – SUPERB
HOSPITALITY – SUPERB
Totally Impressed after visiting this may be before 15 yers.

**Shri. Sunil Malpani,**
Warden Road, Mumbai – 400 026

A great work. Very well maintained & Persistent services. I would love to get associated if given a chance in future. Thank you to all the sevaks.

**Dr. Arati Adheerojekar**

Wonderful center with superb management

**Dr. Indira Hindryn**
Nepeansea Road, Hinduja Hospital

Erba® Mannheim

TRANSASIA®
No.1 Diagnostic Company in India

# TOTAL SOLUTIONS FOR CLINICAL DIAGNOSIS



Clinical Chemistry
Critical Care
Coagulation
Diabetes
Hematology
Immunology
Molecular
Urinalysis

Transasia Bio-Medicals offers **Made in India** products that meet your needs for reliable and affordable IVD solutions. Our portfolio is backed by our sales and application support teams that reach out to over 5000 tier II-IV cities, towns and villages in India.

## OUR STRENGTHS

**150 CRORE+**
Blood tests on Transasia equipment every year

**40,000+**
Laboratories in India with Transasia products

**70,000+**
Installations across India

**700+**
Sales and applications team, the largest in the Indian IVD Industry

## LIVING OUR LEGACY

**COMMITMENT**

**SERVICE**

**TRUST**

**TRANSASIA BIO-MEDICALS LTD.**
Transasia House, 8 Chandivali Studio Road, Andheri (E), Mumbai - 400 072.
T: (022) 4030 9000, Fax: (022) 2857 3030 www.erbamannheim.com
responses@transasia.co.in | 7304448818 | Stay Connected:

ENQUIRE NOW

# परळ केंद्र

## श्री सत्यनारायण महापूजा १३ एप्रिल २०२२



सालाबादप्रमाणे यावर्षी समितीच्या परळ येथील मुख्यालयात श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. सन १९९७ साली याच दिवशी रुग्ण सेवा सदनाच्या वास्तूचे उद्घाटन झाले. तेव्हापासून प्रतिवर्षी श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन केले जाते. यावर्षी रुग्ण सेवा सदनाला २५ वर्ष पूर्ण झाली. समितीमध्ये २५ वर्ष कार्यरत असलेले समितीचे कर्मचारी श्री भिकाजी ठीक व त्यांच्या पत्नी सौ. रेश्मा ठीक यांनी सत्यनारायण पूजेचे पूजन केले.

## डॉक्टर्स दिन : ३ जुलै २०२२




समाजात विशिष्ट ध्येय ठेवून, वैद्यकीय क्षेत्रात समाजासाठी अनेक डॉक्टर्स व्रतस्त भावनेने काम करीत असतात. अश्या व्यक्तिमत्वाला प्रोत्साहन देणे ही सामाजिक जबाबदारी आहे. याच भावनेने गेली १२ वर्षे डॉक्टर्स दिनाच्या निमित्ताने आरोग्य सेवा आणि वैद्यकीय विज्ञानावर महत्त्वपूर्ण प्रभाव पाडणाऱ्या डॉक्टरांच्या उल्लेखनीय योगदानाचा सन्मान समितीमार्फत केला जातो.

३ जुलै २०२२ रोजी डॉक्टर्स दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास प्रमुख अतिथी पद्मश्री ॲड. उज्ज्वल निकम व विशेष अतिथी श्री. धीरज रेली, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, एच. डी. एफ. सी. सिक्युरिटीज लि. उपस्थित होते. यावेळी डॉ सुयश कुलकर्णी, प्राध्यापक व विभाग प्रमुख रेडिओलॉजी, टाटा मेमोरिअल केंद्र, डॉ विवेक भावे, एमडी मेडिसीन, फिजिशियन, कार्डिओलॉजिस्ट, डायबिटोलॉजिस्ट, गांधीनगर गुजरात आणि डॉ अजय चंदनवाले, पीएचडी, ऑर्थोपेडिक्स व सहसंचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन संचालनालय, महाराष्ट्र राज्य या मान्यवर डॉक्टरांचा सन्मान करण्यात आला. यावेळी समितीचे अध्यक्ष डॉ श्रीकांत बडवे, कार्याध्यक्ष श्री. श्रीराम दांडेकर, समितीचे पदाधिकारी, मान्यवर, देणगीदार व हितचिंतक उपस्थित होते.

## कर्मचाऱ्यांसाठी तणाव मुक्त जीवन व कामगार कायदे यावर व्याख्यान २८ जुलै २०२२



बहुतेक कर्मचाऱ्यांना कामगार कायदे, भविष्यनिर्वाह निधी आणि कर्मचारी राज्य विमा योजना याविषयी माहिती नसते. सदर विषयावर परळ कार्यालयात कर्मचाऱ्यांसाठी महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ यांच्यातर्फे व्याख्यान आयोजित करण्यात आले. सामाजिक सुरक्षा योजने अंतर्गत कर्मचाऱ्यांना त्यांचे हक्क, कर्तव्य आणि फायदे यांची माहिती देण्यात आली. श्री नितीन शिंदे, कामगार कायदे विषयक सल्लागार व श्री अनिल लोखंडे, केंद्र संचालक, ललित कला भवन, नायगाव यांनी कर्मचाऱ्यांना संबोधित केले. तसेच श्रीमती पौर्णिमा शिंदे, आकाशवाणी निवेदिका यांनी कर्मचाऱ्यांना तणाव मुक्त जीवन यावर मार्गदर्शन केले.

## ॲक्सेस बार थेरपी १० जुलै २०२२

रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन यांच्या सहकार्याने रुग्ण सेवा सदनातील कर्करोग रुग्णांना प्रत्येक रविवारी अनुभवी व तज्ञ फॅसिलिटेटर मार्फत मोफत एक्सेस बार थेरपी दिली जाते.

ऍक्सेस बार ही एक आरामदायी प्रक्रिया आहे. यामध्ये हाताने तुमच्या डोक्यावरील वेगवेगळ्या बिंदूंना हलके स्पर्श करुन शरीरातील व मनातील तणाव दूर केला जातो.

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे फॅसिलिटेटर श्री. सुखदीपक मालवीय यांनी रुग्ण सेवा सदनातील कर्करोग रुग्णांना एक्सेस बार थेरपी दिली. हा उपक्रम सुरु करण्यात रोटरी क्लब ऑफ मुंबई सायन चे अध्यक्ष श्री सतीश शहा, श्री. सुरेंद्र भगत, समितीचे हितचिंतक श्री अशोक पुराणिक व विश्वस्थ श्री. किरण करलकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.







रोटरी क्लब ऑफ सायन मुंबई व श्री सुखदिपक मालवीय यांनी ॲक्सेस बार या उपक्रमासाठी आवश्यक असणारे टेबल समितीला देणगी स्वरुपात दिले. तसेच श्री सुखदिपक मालवीय यांनी समितीचे कर्मचारी व कार्यकर्ते अश्या १४ जणांना ॲक्सेस बारचे प्रशिक्षण दिले.



# स्वातंत्र्य दिन

## १५ ऑगस्ट २०२२

रुग्ण सेवा सदनामध्ये स्वातंत्र्य दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. श्री. अतुल वझे, सरचिटणीस, भाजपा, महाराष्ट्र राज्य यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी त्यांनी देशाच्या विविध राज्यांतून आलेले रुग्ण व त्यांच्या नातेवाईकांना संबोधित केले.

